DAY — 22 SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	11	1100	J-436	(M)

SOCIOLOGY (45)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) प्रश्नांच्या उजवीकडे पूर्ण गुण दिलेले आहेत.

(३) चार गुणांसाठी विचारलेल्या उपप्रश्नांच्या उत्तरांत किमान चार मुद्दे अपेक्षित आहेत.

(४) प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.

प्र. १. खालील वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा : **[२०]**

(अ) खालील कंसांतील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व ती पुन्हा लिहा : (५)

(१) वर्धमान महावीर हे जैन धर्मातील -------- तीर्थंकर होते.

[चोविसावे, बावीसावे, सोळावे]

(२) -------- समुदायांमध्ये दुय्यम प्रकारचे संबंध महत्त्वाचे असतात.

[ग्रामीण, आदिवासी, शहरी]

(३) ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर म्हणजे ------ ---- होय.

[औद्योगिकीकरण, शहरीकरण, आधुनिकीकरण]

(४) भारतीय लोकदलाची स्थापना ----- या वर्षी झाली.

[१९५४, १९६४, १९७४]

(५) घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा ----- साली पारित करण्यात आला.

[१९९५, २००५, २०११]

(ब) खालील जोड्यांपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून ती पुन्हा लिहा : (५)

(१) (i) राजमार्ग — हिंदू धर्म

(ii) तीर्थंकर — पारसी धर्म

(iii) सेंट थॉमस — ख्रिश्चन धर्म

(iv) अष्टांग मार्ग — बौद्ध धर्म

(२) (i) मुंबई — झोपडपट्टी

(ii) दिल्ली — झुग्गी-झोपडी

(iii) कोलकाता — चेरी

(iv) बंगळूरू — केरी

(३) (i) भाषेवर आधारित संघर्ष — दहशतवाद

(ii) धर्मावर आधारित संघर्ष — संप्रदायवाद

(iii) जातीवाद आधारित संघर्ष — जातीवाद

(iv) प्रदेशावर आधारित संघर्ष — प्रदेशवाद

(४) (i) स्त्री - चळवळ — लैंगिक समानता

(ii) आंतरराष्ट्रीय महिला वर्ष — १९७५

(iii) टुवर्ड्स इक्वालिटी — भारतीय स्त्री-दर्जा विषयक अहवाल

(iv) होमरूल चळवळ — मार्गारेट कझन्स

(५) (i) चरस — मादक द्रव्यांचे व्यसन

(ii) हिंसक चित्रपट — आंतर जालाचे व्यसन

(iii) सेल्फायटिस सिंड्रोम — अमली पदार्थांचे व्यसन

(iv) देशी दारू — मद्याचे व्यसन

(क) चौकटीत दिलेल्या पर्यायांतून योग्य संज्ञा ओळखून त्या दिलेल्या विधानांसमोर पुन्हा लिहा : (५)

देवराई, शिक्षक, महात्मा गांधी, डॉ.बी.आर. आंबेडकर, औद्योगिकीकरण, पितृप्रधान पद्धती

(१) भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष.

(२) आदिवासी समुदायातील पवित्र वने.

(३) अर्जित दर्जा.

(४) उत्पादन प्रक्रियेतील यांत्रिकीकरण.

(५) स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा.

(ड) अधोरेखित शब्द दुरुस्त करून विधाने पुन्हा लिहा : (५)

(१) निर्जीव वस्तूंचे पूजन करण्याच्या पद्धतीला जीवात्मवाद असे म्हणतात.

(२) सर्वधर्म समभाव ही संकल्पना एकता दर्शविते.

(३) १९९६ साली नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यात आले.

(४) कावेरी नदीवर सरदार सरोवर प्रकल्प उभारण्यात आला.

(५) वृद्धत्व ही कृत्रिम प्रक्रिया आहे.

प्र. २. खालील विषयांवर टिपा लिहा (कोणत्याही दोन) : **[८]**

(१) पुरुषार्थ

(२) भारतातील विविधता

(३) अंकीकृतकरणाची वैशिष्ट्ये

प्र. ३. खालील मध्ये फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) आदिम समुदाय आणि शहरी समुदाय

(२) ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम धर्म

(३) आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण

(४) स्वातंत्र्यपूर्व काळातील महिला चळवळ व स्वातंत्र्योत्तर काळातील महिला चळवळ

(५) वैयक्तिक समस्या व सामाजिक समस्या

प्र. ४. खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) आश्रम व्यवस्था

(२) संप्रदायवाद

(३) शहरीकरण

प्र. ५. (अ) खालील संकल्पना चित्र पूर्ण करा : (४) **[१२]**



(ब) खालील विधाने 'सत्य' की 'असत्य' आहेत हे सकारण स्पष्ट करा (८)
(कोणतेही दोन) :

(१) वसाहतकालीन राजवटीचा भारतीय समाजावर महत्त्वपूर्ण लक्षणीय प्रभाव पडला.

(२) समाजसुधारकांनी भारतीय समाजात बदल घडवून आणले.

(३) तंत्रज्ञान हे नेहमीच सामाजिक प्रगतीसाठी उपयुक्त नसते.

प्र. ६. (अ) खालील उतारा वाचून त्या खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (६) **[१०]**

सर्व शिक्षा अभियान *(SSA)* हा भारत सरकारचा कार्यक्रम आहे. ज्यामध्ये ६ ते १४ या वयोगटातील मुलांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था केली आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी भारताचे माजी पंतप्रधान श्री अटल बिहारी वाजपेयी यांनी १९९३-९४ मध्ये पुढाकार घेतला. त्यानंतर २०००-२००१ मध्ये हा कार्यक्रम पूर्णत: कार्यरत झाला. या कार्यक्रमामध्ये शिक्षण हा मूलभूत अधिकार मानला गेला.

याबरोबरच १५ ऑगस्ट १९९५ मध्ये भारत सरकारने 'प्राथमिक शिक्षणासाठी पोषण आधार राष्ट्रीय कार्यक्रम' (National Programme of Nutritional Support to Primary Education, NP-NSPE) राबविला. तेव्हापासूनच शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी मोफत 'माध्यान्ह भोजन' (Midday Meal) ही संकल्पना अस्तित्वात आली, जी ग्रामपंचायत आणि नगरपालिका यांसारख्या स्थानिक संस्थांकरवी राबविली जाते. मुलांना माध्यान्ह भोजन देणे सक्तीचे आहे. यामध्ये दररोज उत्तम आणि पोषक जेवण मुलांना देणे आवश्यक आहे असे मानले आहे. बऱ्याच संस्थांनी जेवण बनविणे व वेळेत शाळेत पोहचविणे हे काम हाती घेतले.

सार्वत्रिक शिक्षण आणि पोषण एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. गावांतील आणि नगरपालिकेच्या शाळांमधील मुले या भोजनाची वाट पाहत असतात. बऱ्याचदा हा आहारच त्यांच्यासाठी दिवसभराचा मुख्य आहार असतो.

प्रश्न :

(१) सर्व शिक्षा अभियान उपयुक्त आहे असे तुम्हास वाटते काय?

(२) ''माध्यान्ह भोजन योजना विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीस चालना देते'' समर्थन करा.

(ब) आपले व्यक्तिगत मत (प्रतिसाद) नोंदवा (कोणतेही एक) : (४)

(१) 'एकता' मूल्याच्या दृष्टीने भारतातील शालेय गणवेशाचे महत्त्व काय आहे?

(२) पर्यावरणीय अभ्यासक्रमामुळे तुमच्या वर्तनावर काही परिणाम झाला आहे का?

प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर १५० ते २०० शब्दांमध्ये लिहा : **[१०]**

(१) ग्रामीण समुदायातील समस्यांची चर्चा करा व त्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचवा.

(२) शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे विशद करा व ही समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचवा.

◆◆◆